# PRSRD - 2016

*State Level Symposium on*

# Panchayati Raj System and Rural Development

***13 February 2016***



*Organised by*

Janata Shikshan Prasarak Mandal's

**PHULSING NAIK MAHAVIDYALAYA,**

(Department of Political Science)

(Reaccredited CGPA 2.66)

Pusad Dist. Yavatmal (M.S.) Pin-445216

*Sponsored by*

**University Grants Commission, New Delhi**

**Human Rights Education Scheme**

**www.pncollegepusad.ac.in**

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 88. | पंचायत राज व दुर्बल घटकांचे कल्याण – प्रा. डॉ. संजय आर. भोयर, फुलसिंग नाईक महा. पुसद जि. यवतमाळ | 220 |
| 89. | पंचायत राज व ग्रामीण विकासाच्या योजना – प्रा. डॉ. अनिल मुडे, फुलसिंग नाईक महा. पुसद जि. यवतमाळ | 222 |
| 90. | पंचायत राज व महिलांचे राजकीय सक्षमीकरण – प्रा. डॉ. बी. डी. वाटोडे, प्रा. एस. एम. चव्हाण, फुलसिंग नाईक महा. पुसद जि. यवतमाळ | 224 |
| 91. | पंचायत राज व ग्रामीण विकासाची दिशा – डॉ. रा. ना. फुलारी, डॉ. एस. पी. कला महा. शेंदूरजना जि. अमरावती | 226 |
| 92. | 73 वी घटनादुरूस्ती आणि लोकशाही – डॉ. रत्नाकर बी. लक्षटे, देगलूर महा. देगलूर जि. नांदेड | 228 |
| 93. | पंचायतराज व्यवस्थेत नेतृत्व विकास – सहा. प्रा. राजेश ना. इंगोले, सहा. प्रा. डॉ. देवानंद स. अंभोरे, श्री. सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशिम. | 230 |
| 94. | पंचायतराज ग्रामसभा व लोकसहभाग – प्रा. उन्मेश अजाबराव घुगे, श्री. सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशिम. | 233 |
| 95. | Role of Panchayat Raj Institutions in the Devlopment of primary Education – Dr. V. P. Sondankar, Phulsing Naik Mahavidyalay, Pusad, Dist. Yavatmal | 235 |
| 96. | An Overview of Women's Participation in Panchayat Raj – Prof. Sahebrao Govindrao Ande, Mahatma Phule Arts, Commerce & Sitarmji Science College, Warud. Dist. Amaravati | 237 |
| 97. | Role of women in panchayat Raj – Dr. Babita Kumari, Arvind Singh, L.A.D. college Nagpur | 240 |
| 98. | Role Of Panchayat Raj Institution In Rural Development (An Statastical Study Of Maharashtra) – Priyanka B. Gaikwad and Sunil N. Khade, Phulsing Naik Mahavidyalay, Pusad, Dist. Yavatmal | 243 |
| 99. | Panchayat Raj and Its Structure and Rural Development Plans of Maharashtra- Prof. Haricharn Gajbhiye. Phulsing Naik Mahavidyalay, Pusad, Dist. Yavatmal | 246 |
| 100. | Medicinal plant – A new source to development of farmers. – Dr. Kahate P. M., Phulsing Naik Mahavidyalay, Pusad, Dist. Yavatmal | 249 |
| 101. | Underwater and Coastal diversity of Edible Bivalve Molluses and Rural Development of Ratnagiri, Maharashtra – S.N. Khade and P.B. Gaikwad, Phulsing Naik Mahavidyalay, Pusad, Dist.Yavatmal | 252 |
| 102. | The Role of Panchayat Raj In The Empowerment of Rural Development – Dr. Hemant S. Mahalle, Phulsing Naik Mahavidyalay, Pusad Dist. Yavatmal | 255 |
| 103. | Various Schemes of Rural Development in India – Dr. Arun B. Patil, Phulsing Naik Mahavidyalay, Pusad, Dist. Yavatmal | 258 |
| 104. | Panchayat Raj System in India : A prospective – Dr. P.H. Suryavanshi, Prof. Rajabhau Deshmukh Kala Mahavidyalay Nandgaon (Kh.) Dist. Aaravati | 260 |
| 105. | Panchayat Raj and Empowerment of Women – Prof. G. B. Shelkikar, Phulsing Naik Mahavidyalay Pusad. Dist. Yavatmal | 262 |
| 106. | The Role of Government officials in Panchayat Raj – Prof. Vijay Rathod, Phulsing Naik Mahavidyalay, Pusad. Dist. Yavatmal | 264 |
| 107 | Historical Perspective on Local Government in India – Shekhar Balkrishna Ashitkar, Dnyanopasak College, Parbhani. | 266 |


Scanned by CamScanner

# 73 वी घटना दुरूस्ती आणि लोकशाही

प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय, देगलूर
ता. देगलूर जि. नांदेड
मो. नं. 09423439276

भारत हा कृशीप्रधान देश आहे. ज्याचा सर्व राजकीय संविधाला अधिन राहुन चालतो. भारतीय संविधानाच्या उददेशपित्रकेपासून ते शेवटच्या कलमापर्यंत लोकशाही प्रतिबिंबित होते. लोकशाही संविधानात बंद राहू नये याचा प्रयन्त संविधानकारांनी केला. 26 जानेवारी 1950 पासून भारतीय लोकशाहीला प्रगल्भ बनवण्यात आले. त्यातील अनेक समस्यांचे उत्तर शासनकर्त्यांनी घटनेत शोधावे व त्यास अनुसरून राज्यकारभार करावा. असा सल्ला घटनाकर्त्यांनी दिला. त्याच सल्यास प्रमाण मानुन राजकर्त्यांनी गरजेप्रमाणे घटनेत बदल करून संविधानास परिपक्व व लोकशाहीला सशक्त बनवले.

भारतीय लोकशाहीला सशक्त बनवण्याच्या प्रक्रियेतील एक भाग म्हणजे 73 वी घटना दुरूस्ती होय. 73 व्या घटना दुरूस्तीमुळे लोकशाहीच्या बळकटीकरणाची प्रक्रिया कशी गतिमान झाली. याविशयीचे चिंतन करण्यात आले.

1973 साली झालेली 73 वी घटना दुरूस्ती केली. संविधानाच्या 7 व्या भागातील 40 व्या कलमात ग्राम पंचायती चा उल्लेख आहे. माग्रदर्शक तत्वाच्या अंमलबजावणी बाबत घटना बंधन लादत नाही. त्यामुळे 1993 पुर्वी देशातील स्थानिक स्वराज्य संस्थांराजकीय व आर्थिक अधिकार दृश्टा दुर्लक्षित होत्या. सत्ता विकेंद्रिकरण हे घटनेचे मूलभूत लक्षण आहे. परंतु 1993 पूर्वी त्यास व्यवहार्यता नव्हती.

1993 साली झालेली 73 वी घटना दुरूस्ती ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेशी संबंधीत आहे. या घटनादुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थेत त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेची निर्मिती केली. त्यात गाव पातळीवर ग्राम पंचायत, तालुका स्तरावर पंचायत समिती व जिल्हा स्तरावर जिल्हा परिशद. या सर्वांना घटनात्मक दर्जा दिला. 9 व्या भागातील 243 व्या कलमात त्याचा समावेश करण्यात आला.

73 व्या घटना दुरूस्तीमुळे भारतीय लोकशाहीला बळकटी प्राप्त झाली. देशातील विशाल समुदायास शासन निर्णय निर्धारण प्रक्रियेत सहभाग सोईचे झाले. अनुसूचित जाती व जमातीचे ग्रामीण राजकारणातील व गावगाडयातील संदर्भ बदलेले. सरपंच या एका शब्दास लोकशाहीचा गंध प्राप्त झाला. धोंडया, राम्या यांचा धोंडीबाराव रामराव झाला. मुलभूत स्त्रियांच्या राजकीय सहभागात्वास घटनात्मक मान्यता मिळाली. घटनेतील एक मत एक मूल्य याची व्यापकता वाढली. मूलभूत हक्काच्या व्यावहारिक परिपक्वतेचा संदर्भ बदलला.

महात्मा गांधी हरिजन या वृत्तपत्रातुन भारतीय स्वातंत्र्याची सुरूवात व्हायला पाहिजे. प्रत्येक खेडे हे गणराज्य बनले पाहिजे. पंचायतीला सर्व अधिकार असले पाहिजेत. जास्तीत जास्त अधिकार म्हणजे जास्तीत जास्त हित होय. याच विचाराला अनुसरून गांधी पुढे म्हणतात की, स्वराज्य म्हणजे अंतिम अधिकार शेतकरी व कामकरी यांनाच असले पाहिजेत. खरी लोकशाही वीस लोक केंद्रात बसून चालवू शकत नाहीत. या लोकशाहीला क्रियान्वित करण्यासाठी निम्न स्तरावर असलेल्या प्रत्येक गावातील लोकांची गरज आहे. गांधीच्या या विचाराला प्रत्यक्षात उतरवण्यासाठी 1993 हे वर्श उजाडले. 73 व्या घटना दुरूस्तीने ग्रामीण भागातील लोकांना लोकशाही विकेंद्रिकरणाच्या प्रक्रियेत सामावून घेतले. भारतीय लोकशाहीला कार्यान्वित करण्यात निम्न स्तरावरील जनता महत्वाचा वाटा उचलते. हे स्पश्ट करून तयांना तशी संधी व अधिकार या घटना दुरूस्तीने दिले.

20 ऑक्टोबर 1959 रोजी नागीर जिल्हातील गांधी जयंती कार्यक्रम व लोकशाही विकेंद्रीकरणाच्या शुभारंभप्रसंगी दीपप्रज्वलन करून पंडीत नेहरू म्हणतात. आपल्या ग्रामसंस्था हजारो चुका करीत असल्या तरी त्यांना सत्तेचे खरे शस्त्र देवु या.

नेहरूच्या या विधानाला व्यावहारिक रूप देण्या–या पहिली पंचवार्शिक योजना, बलवंतराव मेहता समिती सारखे अनेक उपक्रम राबवण्यात आले. या प्रत्येक उपक्रमाला लोकशाही विकेंद्रिकरण, सामुहिक विकास कार्यक्रम, राश्ट्रीय विस्तार सेवा यांची रूजवणुक करण्याच्या दृश्टीने वेगळे महत्व आहे. भारतीय लोकशाही आणि ग्रामिण विकासाच्या सशक्तीकरणासाठी 73 वी घटना दुरूस्त करण्यात आली. भारतात आजपर्यंत झालेल्या घटनादुरूस्त्यापैकी 73 वी घटनादुरूस्ती मोठी व महत्वाची आहे. कारण की या घटनादुरूस्तीमुळे 243 व्या कलमात बरेच उपकलम जोडण्यात आले. 11 वे परिशिश्ट जोडण्यात आले. अनुसुचित जाती, जमाती, इतर मागास प्रवर्ग व महिलांसाठी आरक्षणांची तरतूद करण्यात आली. पंचायतींना अधिकार व कर्तव्याची निश्चिती.



Scanned by CamScanner

करण्यात आली. वित्त आयोग, राज्य निर्वाचर आयोगाची निर्मिती झाली.

या घटना दुरूस्तीतील आरक्षण, राज्य निर्वाचन आयोग ही तत्वे लोकशाही प्रक्रिया रूजवणारे व ती मजबुत करणारे आहेत. या घटनादुरूस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये राजकीय नेतृत्वाचा उदय झाला. राष्ट्रीय नेतृत्वाची प्रशिक्षण शाळा म्हणुन स्थानिक स्वराज्य संस्थाना प्राधान्य मिळू लागले. या घटना दुरूस्तीमुळे निवडणुका कर रचना, कर वसुली व आरक्षण सक्तीचे केले त्यास कायदयाचे पाठबळ दिले. स्थानिक स्वराज्य संस्थेतील तीनही स्तरात याचे पालन होत नसेल तर त्यास न्यायलयात आव्हान देण्याचा अधिकार या घटना दुरूस्तीने नागरिकांना दिला.

लॉर्ड ब्राईसच्या मते स्थानिक स्वराज्य संस्था लोकशाही प्रशिक्षणाच्या प्राथमिक शाळा असतात. ब–याच राजकीय नेत्यांच्या राजकीय जडणघडणीचा प्रारंभ स्थानिक स्वराज्य संस्थेतूनच होतो. उदा–सुभाशचंद्र बोस, पंडित जवाहरलाल नेहरू, यशवंतराव चव्हाण, शरद पवार, विलासराव देशमुख इ. स्थानिक पातळीवर लोकशाही रूजवण्याबाबत नकारात्मक दृश्टीकोन बालगणा–या राज्य सरकार सकारात्मक बनवणारी ही घटनादुरूस्ती ठरली. 73 व्या घटनादुरूस्तीपासूनच स्थानिक स्वराज्य संस्थानामध्ये लोकशाही प्रक्रिया रूजण्यास प्रारंभ झाला. लोकशाहीस पोशण परिस्थिती निर्माण झाली. स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना मिळणारे 50 टक्के आरक्षणाचा प्रारंभ 73 व्या घटना दुरूस्तीपासूनच झाला. स्त्रि – पुरूश राजकीय, सामाजिक समतेचा नारा या घटनादुरूस्तीपासूनच ग्रामीण भागात वाहू लागला. स्त्रि – पुरूशाच्या खांदयाला खांदा देवून शासन, प्रशासनातील निर्णय निर्धारणात सहभागी होवू लागली. कुटुंबापासून ते खेडयापर्यंतच्या सर्व संस्थाना आदर्श बनवण्यातील स्त्रियांचा वाटा वाढला. घटनेतील सामाजिक न्याय, सहभागी लोकशाही, न्यायाचे वितरण, मूलभूत हक्काचे संरक्षण, ग्रामिण विकास, बंधुता या संकल्पनांना व्यावहारिक रूप देण्यात 73 व्या घटना दुरूस्तीची भूमिका महत्वाची ठरली.

संदर्भ ग्रथं :


1. पंचायती राज प्रशासन – डॉ. पारूल शर्मा – रितू पब्लिकेशन्स, जयपूर.
2. महाराश्ट्र शासन आणि राजकारण – प्रा. के. आर. बंग – विद्या बुक्स पबिलशर्य, औरंगाबाद.
3. भारत मे स्थानिक प्रशासन – अशोक वर्मा – आर.बी.एस.ए. पबिलशर्य, जयपूर.
4. भारत मे लोकतांत्रिक विकेंद्रिकरण और नव पंचायती राज – डॉ. राजकुमारी सुराणा – राज पब्लिशिंग हाउस, जयपूर.


Scanned by CamScanner